महाराष्ट्र शासन

क्रमांक :- जशिअ - २०१८ / प्र.क्र. ५५ /जल-७
मृद व जलसंधारण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३ फेब्रुवारी, २०१८.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,

विषय : जलयुक्त शिवार अभियान.
विभाग स्तरीय बैठकीमध्ये उपस्थित मुद्याच्या अनुषंगाने निर्देश.

जलयुक्त शिवार अभियान हा अत्यंत महत्वाकांक्षी कार्यक्रम सन २०१५-१६ पासून राबविण्यात येत असून सदर कार्यक्रमाच्या अमलबंजावणी संदर्भात शासनाने वेळोवेळी शासन निर्णय / परिपत्रके / शासन पत्रान्वये विविध सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर अभियानाअंतर्गत सन २०१६-१७ या वर्षाकरीता निवडलेल्या गावांमध्ये होत असलेल्या कामांची प्रगती, सन २०१७-१८ करीता निवडलेल्या गावांतील कामांचे नियोजन व अमलबंजावणी संदर्भात सर्व क्षेत्रीय यंत्रणामधील संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांच्या सोबत मा.मंत्री, मृद व जलसंधारण यांनी राज्यात सर्वत्र विभागवार बैठका घेऊन कामकाजाचा आढावा घेतलेला आहे. या बैठकामंध्ये उपस्थित करण्यात आलेल्या बाबींच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. अभियानाचे Online Monitoring करण्याकरीता MRSAC यांच्या सहाय्याने स्वतंत्र प्रणाली विकसीत करण्यात आलेली असून सदर प्रणालीवर माहिती भरण्यासाठी प्रत्येक तालुक्यात कंत्राटी पध्दतीने एक स्वतंत्र डेटा एन्ट्री ऑपरेटर नियुक्त करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. या करीता जलसंधारण विभागात स्वतंत्र प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) देखील स्थापन करण्यात आलेला आहे मात्र अभियान अतंर्गत करण्यात आलेल्या कामांबाबत दर १५ दिवसांनी माहिती संकलीत करताना प्रणालीवर अदयावत माहिती उपलब्ध होत नसल्याने विभागाकडून अदयापही प्रत्यक्ष (Offline) माहिती संकलीत करण्यात येते. Online व Offline वरील माहितीमध्ये फारमोठया प्रमाणात फरक दिसून येत असून ही बाबत निश्चित योग्य नाही. मा.मुख्यमंत्री महोदयांच्या कार्यालयाकडून देखील वेळोवेळी Online प्रणालीवरील माहितीचे अवलोकन करण्यात येत आहे. **जलयुक्त शिवार अभियानांतर्गत करण्यात येत असलेल्या सर्व कामांची MRSAC प्रणाली मध्ये नोंद करणेबाबत व Geo Tagging करणेबाबत शासन पत्र क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.१/ जल-१ दि.२२ नोव्हेंबर २०१७ नुसार करण्यात आले आहे.**

त्यानुसार **यापुढे Geo Tagging केल्याशिवाय जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचे देयक अदा करण्यात येऊ नये.**

२. अभियान अंतर्गत सन २०१७-१८ या वर्षापासून निवडलेल्या गावांसंदर्भात उपचार क्षमता नकाशा (Treatment Potential Map ) उपलब्ध करुन देण्यात आलेले असून, त्यानुसार सदर गावामध्ये घ्यावयाच्या कामांचा **कृती आराखडयास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर याबाबतची माहिती संबधित विभागीय कृषि सह संचालक कार्यालयातील GIS Cell ला देण्यात यावी.**

३. प्रचलित पध्दतीनुसार अभियान अंतर्गत निवडलेल्या गावा संदर्भात करण्यात आलेल्या आराखडयास ग्राम सभेची मान्यता प्राप्त झाल्या नंतर सदर आराखडयास जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांची मान्यता घेण्यात येते. **यापुढे सदर आराखडयास विभागीय आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर ग्रामसभेस अवगत करण्यात यावे.**

४. अभियाना अंतर्गत निवड करण्यात आलेल्या गावातील आराखडयातील दुरुस्तीच्या कामांसंदर्भात दुरुस्तीवरील खर्च हा अशा उपचाराच्या नविन कामाच्या प्रचलित आर्थिक मापदंडाच्या कमाल २०% पेक्षा अधिक असणार नाही याची दक्षता घ्यावी असे निर्देश यापुर्वी या विभागाच्या दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ च्या पत्रान्वये देण्यात आलेले आहेत. या संदर्भात असे निर्देश देण्यात येत आहेत की, **अभियानातंर्गत प्रस्तावीत असलेल्या ज्या कामांच्या दुरुस्तीवरील खर्च हा वर नमूद मर्यादेपेक्षा जास्त होत असेल व अशी कामे गाव जलपरीपुर्ण होण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे अशा कामाच्या बाबतीत वर नमुद केल्यानुसार कमाल २०% मापदंडाची मर्यादा त्या कामापुरती शिथील करण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समितीला राहतील.**

५. अभियान अतंर्गत मृदसंधारण यंत्रणेशी संबंधीत असलेल्या कामांबाबत ठेकेदारांकडून प्रतिसाद प्राप्त होत नसल्यास, **अशा कामांची तीन वेळा निविदा मागवून देखील प्रतिसाद प्राप्त झाला नाही तर अशी कामे विभागातंर्गत करण्याकरीता जिल्हास्तरीय समितीची मान्यता घेण्यात यावी व त्यानंतर सदर कामे विभागातंर्गत करण्यात यावीत.**

६. मृद संधारणाची कामे दर्जेदार होण्याकरीता या कामांवर असणाऱ्या अर्थमुव्हर्स यंत्रचालकांचे प्रशिक्षण घेण्यात यावे. या प्रशिक्षणामध्ये कम्पार्टमेंन्ट बन्डींग, ग्रेडेट बन्डींग, सलग समलत चर (CCT), खोल सलग समतल चर (Deep CCT) इत्यादी मृद संधारण उचारांचे काटछेद (Sections), पातळी (Level) इत्यादी तांत्रिक बाबींचा समावेश असावा. **असे प्रशिक्षण हे प्रत्यक्ष** (Hands on ) **स्वरुपाचे असावे.**

७. अभियान अंतर्गत निवडलेल्या गावातील साखळी सिमेंट नाला बांधच्या ३ ते ६ कामांचा एक क्लस्टर करण्यात यावा व प्रत्येक मंडळातील कामासंदर्भात संबधित अधिक्षक अभियंता यांचेकडुन एक निविदा सूचना काढण्यात यावी असे निदेश यापुर्वी या विभागाच्या दि. ५ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आलेले होते. या सुचनांमुळे अधिक्षक अभियंता यांचेस्तरावर विलंब होत असल्याचे दिसुन येत असल्याने

आवश्यक तेथे **सदरची अट शिथील करण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समितीस प्रदान करण्यात येत आहेत.**

८. सिमेंट क्रॉक्रीट नाला बांधाच्या भौतिक व आर्थिक मापदंडाबाबत एकत्रित मार्गदर्शक सूचना शासन निर्णय क्र. सासिब-२०१४/प्र.क्र.२०९/जल-७, दि. २३/०६/२०१७ अन्वये निर्गमित करण्यात आलेला आहे. **या शासन निर्णयातील सूचना संदर्भात पाणलोट क्षेत्र हे मुक्त पाणलोट क्षेत्र म्हणुन विचारात घेण्यास हरकत नसावी. तसेच सिमेंट बंधारा आर्थिक निकषामध्ये बसत असेल व गाव जलपरिपुर्ण होण्याच्या दृष्टीने आवश्यक असेल अशा बंधाऱ्याकरीता भौतिक निकष शिथील करण्याचे अधिकार जिल्हा स्तरीय समितीला राहतील.**

९. सन २०१७-१८ या वर्षाकरीता निवडलेल्या गावांकरीता चालू वित्तीय वर्षामध्ये सुमारे रू. २५० कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे. सन २०१७-१८ मधील गावातील कामे दि. १५ जुन, २०१८ पर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे. सन २०१७-१८ च्या गावातील कामांसाठी उर्वरीत विशेष निधी अभिसरणानुसार सन २०१८-१९ मध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. त्यामुळे सन २०१७-१८ करीता निवडलेल्या गावातील कामे निश्चित करून दिलेल्या वेळापत्रकानुसार करण्यात यावीत.

१०. विभागीय स्तरावर किंवा जिल्हा स्तरावर जलयुक्त शिवार अभियानाचा आढावा घेतांना आदर्श गाव योजना, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम व जलसंधारण / मृद संधारणाच्या इतर योजनांचा देखील आढावा घेण्यात यावा.

३/२/१८

(एकनाथ डवले)
सचिव मृद व जलसंधारण

प्रत अग्रेषित.
आयुक्त, मृद व जलसंधारण औरंगाबाद.
संचालक मृद संधारण व पाणलोट व्यवस्थापन पुणे
मुख्य अभियंता लघु सिंचन जलसंधारण पुणे.